Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक ५(२)] बुधवार, जानेवारी २१, २०२६/ माघ १, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ-नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (असा.)(ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६२.

आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल

सूचना

क्रमांक मनपाना-नरवि-२००६-२०२५.-

नागपूर शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३- प्र.क्र. ३०० (अ)९७ नवी-९, दि. ०७ जानेवारी २००० अन्वये मंजुर झाली असून ती दि. ०१ मार्च २००० पासून अंमलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-नवि-९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि. २१ सप्टेंबर, २००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.७६/ नवि-९,दि. २७.फेब्रुवारी, २००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तथापि शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९- प्र.क्र. १५४/२०१९-नवि-९, दि.२७ ऑगस्ट, २०१९ अन्वये संपूर्ण क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासनाकडील शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१९ / प्र.क्र.- १५४ (भाग-१) / २०१९-नवि-९, दि ०९ एप्रिल, २०२१ अन्वये ७ योजनेतील स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील क्षेत्र वगळून पुन्हा त्या क्षेत्राकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, मौजा-बोरगांव येथील खसरा क्र. १५७/६ पैकी १५८ पैकी, व १६३ पैकी मधील १.२२८ हेक्टर क्षेत्राची जागा MNW-२७ माध्यमिक शाळेकरीता राखीव असून, उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण नागपूर महानगरपालिका/खाजगी संस्था म्हणून आहे. सदर आरक्षणाच्या जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे.

नागपूर महानगरपालिकेने आरक्षण क्र. MNW-२७ माध्यमिक शाळेच्या राखीव जागेच्या अनुषंगाने ६२९४.४५३ चौ.मी. क्षेत्राची जागा ताब्यात घेतलेली असून, त्याबाबतची नोंद आखिव पत्रिकेत आहे. तसेच मंजूर अभिन्यास नकाशानूसार माध्यमिक शाळेकरीता ६३६१.०० चौ.मी. एवढे क्षेत्र नमूद आहे. नागपूर महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या जागेच्या आकारमानानूसार राखीव जागेच्या स्थानमानात बदल करणेची कार्यवाही करणे आवश्यक होते, तथापि तशी कार्यवाही यापूर्वी करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेच्या ताब्यातील ६२९४.४५३ चौ.मी. क्षेत्रापैकी जे क्षेत्र आरक्षण क्र. MNW -२७ माध्यमिक शाळेसाठी राखीव आहे, त्यापैकी सुमारे ३२५८.१६ चौ.मी. क्षेत्राची जागा मंजूर विकास योजनेत दर्शविलेल्या आरक्षणाच्या हद्दीनूसार असून, उर्वरीत क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ठ आहे. त्यामुळे उक्त आरक्षित माध्यमिक शाळेच्या जागेच्या नामाभिधानामध्ये फेरबदल करावयाचे झाल्यास आरक्षण क्र. MNW-२७ माध्यमिक शाळेच्या राखीव जागेपैकी ३२५८.१६ चौ.मी. क्षेत्राच्या जागेत फेरबदल करणे आवश्यक आहे. त्याबाबत विकास योजनेच्या भाग नकाशात सदर क्षेत्र दर्शवून भाग नकाशा सोबत सादर केलेला आहे. तसेच या भागात माध्यमिक शाळेकरीता जागेची आवश्यकता नसून, माध्यमिक शाळेचा प्रस्ताव नसल्याचे शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, नागपूर यांनी कळविलेले आहे.

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री आवास योजनेमार्फत उक्त जागेवर प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) विकसीत करावयाचे असल्याचे कळविले आहे. त्यामुळे आरक्षण क्र. MNW- २७ माध्यमिक शाळेकरीता राखीव १.२२८ हेक्टर जागेपैकी ३२५८.१६ चौ. मी. क्षेत्राची जागा नागपुर महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याने व सदर जागेस मंजूर अभिन्यासातील १२.०० मी. रुंदीचा रस्ता पोच म्हणून असल्याने सदर आरक्षण क्र. MNW-२७ माध्यमिक शाळेचे आरक्षित जागेपैकी ३२५८.१६ चौ.मी. जागेचे नामाभिधान बदलून "Public Housing" (सार्वजनिक गृहनिर्माण) असे करणेकरीता सुधारीत मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना सुधारीत मध्ये मौजा- बोरगांव, खसरा क्र. १५७/६ पैकी, १५८ पैकी व १६३ मधील आरक्षण क्र. MNW-२७ माध्यमिक शाळेचे राखीव क्षेत्र १.२२८ हेक्टर जागेपैकी नागपूर महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली ३२५८.१६ चौ.मी. क्षेत्राच्या आरक्षणाचे नामाभिधानात बदल करुन "Public Housing" (सार्वजनिक गृहनिर्माण) करीता राखीव ठेवणे बाबत मंजूर विकास योजना सुधारीत मध्ये बदल महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याचे ठरविले आहे. व यासाठी नागपूर महानगरपालिकेने ठराव क्र. ७१/मनपा/प्रशासक, दि. २० नोव्हेंबर, २०२५ नुसार उपरोक्त फेरबदलाची कार्यवाही करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नागपूर शहराच्या सूधारीत विकास योजनेचा भाग नकाशा महानगरपालिकेच्या उपसंचालक, नगर रचना विभाग, श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, बी व सी विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४०००१ या कार्यालयात कामकाजाचे सर्व दिवशी कार्यालयीन कामकाजाचे वेळेत जनतेच्या निरीक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे. तरी नागरीकांना सुचित करण्यात येते की, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे कालावधीत विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात ज्या सूचना किंवा हरकती उपसंचालक, नगररचना, नागपूर महानगरपालिकेकडे प्राप्त होतील त्यावर महानगरपालिकेकडून सुनावणी देण्यात येईल. तद्नंतर फेरबदलाचा प्रस्तुत प्रस्ताव नागपूर महानगरपालिकेकडून शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

नागपूर :
दिनांक १२ डिसेंबर, २०२५.

डॉ.अभिजित चौधरी,
आयुक्त तथा प्रशासक,
नागपूर, महानगरपालिका, नागपूर.

भाग १-अ (असा.)(ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६३.

BY COMMISSIONER, AND ADMINISTRATOR NAGPUR MUNICIPAL CORPORATION

MODIFICATION UNDER SECTION 37 OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966

NOTICE

No.NMC-TPD-2006-2025.-

Nagpur City Revised Development Plan has been sanctioned by the Government under Section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 *vide* Government, Urban Development Department Notification No. TPS-2496-2643-P.R. 300 (A)-97 Navi-9, dated 07th January 2000 and the same has come into force with effect from 01st March 2000. Likewise, the Development Plan of the excluded area has been sanctioned *vide* Government Notification, Urban Development Department No. TPS-2400-1628-C.R.-200-Navi-9, dated 10th September, 2001 and the same has come into force with effect from 21st September, 2001. Also, *vide* Government, Urban Development Department Notification No. TPS-2401-885-P.R.-76/ Navi- 9, dated 27th February, 2002, the areas of seven schemes under Nagpur Improvement Trust were excluded and Nagpur Municipal Corporation was declared as the Planning Authority for the remaining Nagpur city area. However, vide Government, Urban Development Department Notification No. TPS-2419-1419-P.R. 154/2019-Navi-9, dated 27th August, 2019, Nagpur Municipal Corporation was declared as the Planning Authority for the entire area. Thereafter, vide Government Resolution No. TPS-2419/P.R.-154 (Part-1)/2019-Navi-9, dated 09th April,2021, the area under the Smart City Town Planning Scheme of the seven schemes was excluded again and Nagpur Improvement Trust was re-declared as the Planning Authority for that area.

And whereas, in Mouza-Borgaon, out of Khasra Nos. 157/6 (part), 158 (part) and 163 (part), a total area of 1.228 hectares is reserved for MNW-27 Secondary School and the appropriate authority for the said reservation is Nagpur Municipal Corporation / Private Institution. Nagpur Municipal Corporation is the Planning Authority for the said reserved land.

Nagpur Municipal Corporation has taken possession of 6294.453 sq.m. area of land in connection with the reserved land of Reservation No. MNW-27 - Secondary School, and the corresponding entry is recorded in the property register. As per the approved layout plan, an area of 6361.00 sq.m. is shown for the Secondary School. Based on the dimensions of the land taken in possession, it was necessary to undertake the procedure for modification of the location of the reserved land; however, such procedure has not been undertaken earlier. Therefore, out of the 6294.453 sq.m. land in possession of Nagpur Municipal Corporation, approximately 3258.16 sq.m. falls within the boundary of Reservation No. MNW-27 - Secondary School as per the approved Development Plan and the remaining area falls within the Residential Zone. Therefore, if the nomenclature of the said reserved Secondary School land is to be modified, it is necessary to modify the reservation over the 3258.16 sq.m. area. The same has been depicted in the Part Plan of the Development Plan enclosed herewith. Also, the Education Officer, Nagpur Municipal Corporation, has informed that there is no requirement for land for a Secondary School in this area and that no proposal exists for the Secondary School.

The Executive Engineer, Pradhan Mantri Awas Yojana, has informed that PMAY housing is proposed to be developed on the said land. Therefore, out of the 1.228 hectares of land reserved for Reservation No. MNW-27 - Secondary School, as an area of 3258.16 sq.m. is in the possession of Nagpur Municipal Corporation and as the said land has access through a 12.00 m. wide road shown in the approved layout plan, it is necessary to implement a modification proposal under Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for changing the nomenclature of the said 3258.16 sq.m. reserved land of

Reservation No. MNW-27 Secondary School to "Public Housing".

In the Revised Development Plan of Nagpur City, out of the 1.228 hectares reserved for Reservation No. MNW-27 - Secondary School in Mouza-Borgaon, Khasra Nos. 157/6 (part), 158 (part) and 163 (part), it has been decided to modify the nomenclature of the 3258.16 sq.m. area in possession of Nagpur Municipal Corporation and reserve it for "Public Housing". For this purpose, it has been resolved to carry out a modification in the approved Revised Development Plan under Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Nagpur Municipal Corporation has granted approval to undertake the above modification vide Resolution No. 71/NMC / Administrator, dated 20th November, 2025.

Therefore, the Part Plan of the Revised Development Plan of Nagpur City showing the above modification has been kept open for public inspection during office hours on all working days at the office of the Deputy Director, Town Planning Department, Nagpur Municipal Corporation, Shri Chhatrapati Shivaji Maharaj Administrative Building, B & C Wing, 3rd Floor, Corporation Road, Civil Lines, Nagpur - 440001. Citizens are hereby informed that objections or suggestions regarding the above modification received by the Deputy Director, Town Planning, Nagpur Municipal Corporation within one month from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette will be heard by the Municipal Corporation. Thereafter, the present modification proposal will be submitted by Nagpur Municipal Corporation to the Government for approval.

Nagpur :
Dated the 12th December, 2025.

Dr. ABHIJIT CHOUDHARY,
Commissioner And Administrator,
Nagpur Municipal Corporation, Nagpur.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.